महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३४ वा | दिनांक : १२/०७/२०२५ | वार : शनिवार

## अजितदादा पवार महाजातीवादी - लक्ष्मण हाकेंची जीभ पुन्हा घसरली



**पुणे :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवारांवर टीका केली आहे. यापूर्वी देखील लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर शिवराळ भाषेत टीका केली होती. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे सुरज चव्हाण यांनी लक्ष्मण हाके यांना महाराष्ट्रात फिरू देणार नसल्याचा इशारा दिला होता. तर एका नेत्याने त्यांना नोटीस बजावली आहे. या नोटीसला प्रत्युत्तर देताना लक्ष्मण हाके यांची पुन्हा जीभ घसरल्याचे समोर आले आहे.

लक्ष्मण हाके यांना कायदेशीर नोटीस आल्यानंतर त्याला उत्तर देताना लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर पुन्हा टीका केली आहे. ते म्हणाले, अजितदादा पवार यांना आम्ही महाजातीवादीच म्हणणार आणि त्याचा पश्चाताप आम्हाला अजिबात वाटत नाही. कारण, या अजितदादा पवार यांनी ओबीसींचे वसतीगृह नाकारले आहे. ओबीसींच्या पोरांना फेलोशिप नाकारली. शोषित, वंचितांना निधी नाकारला. हाच अजितदादा पवार आपल्या आजारी कारखान्यांसाठी आताच्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये दोन हजार कोटीपेक्षा जास्त निधी मंजूर करून घेतो. ओबीसींचे भवितव्य असणाऱ्या ओबीसींच्या पोरांना शिष्यवृत्ती नाकारणाऱ्या अजितदादांना आम्ही हरXXX म्हणू नये, तर काय म्हणावे?

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, अजितदादा पवार हे काय तांदळासारखे आहेत का? अजितदादा पवार यांच्यावर 70 हजार कोटीचा घोटाळा केल्याचा आरोप असताना तुम्ही काय हभप आहेत का? अजितदादा पवार तुम्ही साधू संत आहात का? तुम्ही महाराष्ट्राला लागलेली कीड आहात. महाराष्ट्राच्या तिजोरीवर दिवसाढवळ्या दरोडा घालणारे तुम्ही आहात. त्यामुळे हरXXX हा शब्द खूप सौम्य आहे. तुम्हाला तर दरोडेखोर म्हटले पाहिजे.

होय मी हरXXX म्हटलो आहे. त्यांनी मला काय नोटीस पाठवली आहे, ते मी बघून घेईल आणि अशा जर नोटीसा तुम्ही मला पाठवणार असाल तर आयला मायला म्हणणारे तुम्ही, या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना अमृत पाजणारे तुम्ही, लाईट गेली तर पोरं होतात, असा शोध लावणारे तुम्ही मग तुम्हाला आम्ही काय म्हणायचे? हे आम्ही आगामी काळात निश्चितपणे तुम्हाला सांगू, असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला आहे.

## संस्थाचालकाच्या मारहाणीत पालकाचा मृत्यू



**परभणी :** मुलीचे शालेय शुल्क व टीसी मागण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीचा संस्थाचालकाच्या मारहाणीत मृत्यू झाल्याची संतापजनक घटना परभणी जिल्ह्यातील एका शाळेत घडली आहे. या घटनेमुळे पालकवर्गात एकच खळबळ माजली आहे.

परभणीच्या झिरो फाटा येथील हायटेक रेसिडेन्शिअल स्कूलमध्ये ही घटना घडली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, परभणीतील उखळद येथील 42 वर्षीय जगन्नाथ हेंडगे यांची मुलगी पल्लवी हायटेक रेसिडेन्शिअल स्कूलमध्ये इयत्ता तिसरीत शिकत आहे. प्रभाकर चव्हाण यांचीही शाळा आहे. पल्लवी या शाळेच्या निवासी वसतिगृहात राहत होती. पण ती लाहन असल्यामुळे तिला तिथे करमत नव्हते. त्यामुळे तिचे वडील जगन्नाथ हेंडगे तिला घरी घेऊन गेले होते.

त्यानंतर जगन्नाथ यांनी गुरूवारी शाळेत येऊन शालेय व्यवस्थापनाकडे आपल्या मुलीची टीसी व तिच्या प्रवेशासाठी भरलेले शैक्षणिक शुल्क मागितले. त्यावेळी शाळेचे संस्थाचालक प्रभाकर चव्हाण व त्यांच्या पत्नी रत्नमाला चव्हाण यांनी त्यांना बेदम मारहाण केली. त्यात हेंडगे गंभीर जखमी झाले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मुंजाजी हेंडगे यांच्या तक्रारीनुसार पूर्णा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे रत्नमाला चव्हाण या हिंगोली जिल्हा परिषदेच्या माजी शिक्षण सभापती आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे परभणी जिल्ह्यात निवासी गुरूकुल शिक्षण पद्धतीचे स्तोम माजले आहे. जिल्ह्यात अशा प्रकारच्या अनेक शाळा स्थापन झाल्या आहेत. त्या वेळोवेळी पालकांचा फीस वसुलीसाठी पिळवणूक करत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. पण या घटनेमुळे परभणीच्या शिक्षण क्षेत्रात मोठी खळबल माजली आहे. पूर्णा पोलिस या घटनेचा तपास करत आहेत. या प्रकरणी शाळा परिसरात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

शैक्षणिक संस्थांमधील सुरक्षा ही विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सुरक्षित शैक्षणिक वातावरण सुनिश्चित करण्यासाठी भौतिक आणि मानसिक सुरक्षेच्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. भौतिक सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, प्रशिक्षित सुरक्षा रक्षक, प्रवेश नियंत्रण प्रणाली आणि अग्निशमन यंत्रणा यासारख्या सुविधा असाव्यात. मानसिक सुरक्षेसाठी गुंडगिरीविरोधी धोरणे, समुपदेशन सेवा आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. परभणी येथील प्रस्तुत घटना शैक्षणिक संस्थांमधील हिंसाचार आणि सुरक्षेच्या अभावाची गंभीर समस्या दर्शवते. अशा घटना टाळण्यासाठी कठोर नियम, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, पालक-शिक्षक संवाद आणि आपत्कालीन योजनांचा अंमल आवश्यक आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांशी समन्वय साधून शैक्षणिक संस्था अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवता येतील.

## जनसुरक्षा कायद्यावरून काँग्रेसचा सरकारवर निशाणा

**पुणे :** देशाचे गृह मंत्री अमित शहा हे वारंवार नक्षलवाद नियंत्रणात आल्याची वक्तव्ये करत असतांनाच, त्यांनी एका मुलाखतीत आकडेवारी नुसार 72 % नक्षलवाद संपुष्टात आल्याचे सांगून 2026 मध्येच, देश नक्षलवाद मुक्त होईल सांगितले. तर मग पुन्हा "युएपीए / मोक्का कायदा" अस्तित्वात असतांना देखील 'जन सुरक्षा कायद्याची' गरज का भासली..?याचे कारण स्वायत्त संस्थांवर, काही माध्यमांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करून ही 'विरोधी आवाज , विरोधी मते , सरकार वा निवडणूक आयोग, ईडी आदी ना प्रश्न विचारणे थांबवत नाही हे लक्षांत आले आहे.

सरकारची उत्तरे देण्यात दमछाक होते आहे म्हणूनच "जन सुरक्षा नव्हे तर सत्ता सुरक्षा" कायदा , एकमताने नव्हे तर 'बहुमताच्या' जोरावर मंजुर करण्यात आल्याची टिका काँग्रेस प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुलजी गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत ४० नक्षलवादी संघटना होत्या असे धक्कादायक, निराधार, तथ्यहीन व दिशाभूल करणारे आरोप केले होते.मात्र, गृहखाते हाताशी असुनही आज अखेर त्यातील एक ही नक्षलवादी असल्याचे सरकार सिद्ध करू शकले नाही किंबहुना 'एकावर ही एफआयआर' दाखल करू शकले नाही. त्यामुळे विरोधकांना नक्षलवादी ठरवण्याची या सरकारची फॅशन झाली आहे. याविषयी मविआ नेत्यांनीही टिका केली आहे.राज्यातील विरोधी पक्ष हे जबाबदार सत्ता राबवलेले पक्ष असुन, त्यांना जनहितार्थ कोणत्या कायद्याची आवश्यकता आहे हे चांगल्या प्रकारे कळते.

मात्र सत्तेतील महायुतीच्या नेत्यांना स्वकर्तबगारी ची वानवा असल्याने, विरोधकांच्या प्रश्नांनाच सामोरे जाऊ नये असे वाटते व त्या अपराधीक, असुरक्षित भावनेतूनच जनसुरक्षा कायद्याचा घाट घातला हे 'वास्तव राजकीय परिस्थितीतुन' स्पष्ट होत असल्याचे तिवारी यांनी सांगितले.

त्यामुळे फडणवीस सरकारचा हा जन सुरक्षा कायदा नव्हे तर सत्ता सुरक्षा कायदा करण्याचा प्रयत्न असून, विरोधकांना नामोहरम करण्यासाठी हा कायदा केल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. विरोधकांना चौकशी विना वा पुराव्या विना दिर्घ काळ चौकशी साठी, डांबण्यासाठी हा 'जन सुरक्षा कायदा' केला काय..? असा खरमरीत प्रश्न ही तिवारी यांनी केला.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ जुलै २०२५


## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्सहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री. निखिल माने व श्रीमती एम.बी. मराठे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कथा सादर केल्या. श्रीमती मराठे यांनी गुरु - शिष्य परंपरेवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी मु. अ. श्री. पहिलवान यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. रजत अधिकार व चि. प्रेम आव्हाड यांनी तर आभार प्रदर्शन कु. प्रांजल गंगावणे हिने केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** गुरु पोर्णिमे निमित्त डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या IQAC, SQAAFआणि MKCL - अक्षरा कम्प्यूटर्स द्वारा 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुयोग्य माहिती तंत्रज्ञानाचा महाविद्यालयीन शिक्षणात प्रभावी वापर' याविषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी मंचावर प्रमुख वक्ते म्हणून निलेश झाल्टे, श्रीमती वसेकर मॅडम तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, डॉ. पराग चौधरी यांची उपस्थिती होती.कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना निलेश झाल्टे म्हणाले की, शिक्षणात एआयचा उपयोग हा महत्वपूर्ण झाला आहे. त्याचे काही फायदे आणि तोटे आहेत. आपण आज फायदेविषयक माहिती बघणार आहोत. काही साधनाचा वापर कसा करायचा याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करुन दाखवले. ते म्हणाले तंत्रज्ञानाशी दोस्ती करा म्हणजे काम सुखद व सोपे, सहज आणि स्मार्ट होईल. प्राचार्य डॉ सुनिता बाजपाई यांनी अध्यक्षीय समारोप केला. आपल्या अध्यक्षीय भाषणा प्रसंगी डॉ. बाजपाई यांनी सर्वांना गुरु पोर्णिमेनिमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, आजच्या काळात गुरुजनांनी काळानुसार अद्यावत होणे खूप गरजेचे आहे. शिक्षकांना अध्ययन - अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करता यावा म्हणूनच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. पराग चौधरी यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा. ज्योती मंठाळकर प्रा. शरद देशमुख यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा व वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयात गुरु पौर्णिमा साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयात उत्साहात गुरु पौर्णिमा साजरी करण्यात आली या कार्यक्रमात मुलांनी आपल्या गुरुवर्यांचे व आपल्या आई वडिलांचे पूजन केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री अमलेश पाटील प्रमुख उपस्थिती एस बी वाघमारे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ जुलै २०२५


## पुण्यात लैंगिक गुन्ह्यांचे सत्र

**पुणे :** अल्पवयीन मुलीकडे अश्लिल हातवारे व चाळे करत तिचा विनयभंग करणाऱ्या एकावर सिंहगडरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप दत्तात्रय मारणे (रा. वडगाव बुद्रुक) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान दुकानात गेलेल्या अल्पवयीन मुलीच्या अंगावर अश्लिलपणे हात फिरवून तिचे चुंबन घेतल्याचा प्रकार येरवडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडला. याप्रकरणी राजु ताज्जुद्दिन दबीर (55, रा. एनआयबीएम, कोंढवा) याच्यावर गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली आहे. याबाबत 17 वर्षीय मुलीने फिर्याद दिली आहे.आरोपीवर पॉस्कोच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसऱ्या गुन्ह्यात तरूणीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करून तिला तुम मेरे साथ डेट पे चलोगी क्या? असे म्हणून हात पकडून अश्लिल स्पर्श करून मिठी मारत शरिर सुखाची मागणी करणाऱ्या एकावर विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका 30 वर्षीय महिलेनी दिलेल्या फिर्यादीवरून कुमार संजीव (35, रा. भोपाळ मध्यप्रदेश) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार नोव्हेंबर 2024 ते मार्च 2025 दरम्यान घडला.

तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणात एकावर आंबेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश नवगिरे (23, रा. टिळेकरनगर, कोंढवा) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका 23 वर्षीय तरूणीने आंबेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपीने तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत शाररिक संबंध ठेवले. तसेच तिचे विवस्त्र फोटो सोशल मिडीयावर शेअर करून तिची बदनामी केली. तसेच तिचे इन्स्ट्राग्राम अकाउंट अकाउंट आरोपीने बंद करण्यास सांगितल्यानंतर तिने नकार दिल्यानंतर आरोपीने तिला मारहाण केल्याचे तक्रारीत सांगितले आहे. पुढील तपास आंबेगाव पोलिस करत आहे.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात काल ११ जुलै रोजी सकाळी ११वाजता श्रीकृष्ण महाविद्यालयात डॉ. के. एस. लोहार यांच्या अध्यक्षतेखाली व प्राचार्य डॉ.राठोड जी. एम., कार्यक्रमाधिकारी डॉ. उगले बी.जे., विभागप्रमुख प्रा. कोळी आर.जी. यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक लोकसंख्या दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गावित एस.डी. हे उपस्थितांना मार्गदर्शन केले. लोकसंख्या वाढ ही दोन्ही अंगाने पाहिली जाते. लोकसंख्या वाढीमुळे अनेक समस्या निर्माण होतात त्याचबरोबर अनेक गंभीर प्रश्नही सुटू शकतात परंतु त्यासाठी लोकसंख्या वाढीमध्ये गुणवत्ता निर्माण केली पाहिजे. लोकसंख्या वाढीत बहुतांश वेळेला आळा घालणे कठीण होऊन बसते.अनेक राष्ट्रांत मनुष्यबळ कमी होऊन तिथल्या अर्थकारणावर अनिष्ट परिणाम होऊ घातल्याचे लक्षात आले आहे. त्यासाठी सजग होणे, जाणीवजागृती करणे आणि उपयुक्त राष्ट्रीय धोरण स्वीकारून त्याची यथायोग्य अंमलबजावणी करणे समाजहिताचे आणि एकूणच राष्ट्रहिताचे ठरेल. यावेळी प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय भूगोल विभागप्रमुख प्रा.कोळी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.धनेराव व्ही.के. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. देशमुख यांनी मानले. अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी विद्यार्थी आणि प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

## संजय गायकवाड यांच्यावर अखेर गुन्हा



**मुंबई :** आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर अखेर आज अदखलपात्र गुन्हा दाखल झाला. यामुळे त्यांच्या अडचणींत मोठी भर पडण्याची शक्यता आहे. पण गायकवाड यांनी चांगल्या कामासाठी कितीही गुन्हे दाखल झाले तरी आपल्याला त्याची परवा नसल्याचे ठणकावून सांगितले आहे.

आमदार संजय गायकवाड यांनी गत मंगळवारी रात्री आमदार निवासातील कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. त्यांनी आपल्याला या कॅन्टीनमधून शिळे अन्न मिळाल्याचा आरोप केला होता. या घटनेचे राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी गायकवाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे संकेत दिले. पोलिसांनी या प्रकरणाची निश्चितपणे चौकशी केली पाहिजे. अशा प्रकारच्या घटनांसाठी कोणतीही औपचारिक तक्रार आवश्यक नसते. गुन्हा दखलपात्र असेल, तर पोलिस स्वतःहून कारवाई करू शकतात, असे ते म्हणाले होते.

मुख्यमंत्र्यांच्या या विधानानंतर मुंबईच्या मरीन ड्राईव्ह पोलिसांनी संजय गायकवाड यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे. सोशल मीडियातील व्हिडिओ व पोलिस कर्मचाऱ्याच्या तक्रारीच्या आधारावर हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आता या गुन्ह्याची माहिती पोलिसांकडून विधानसभा अध्यक्षांना कळवली जाणार आहे. सेक्शन 352, 115 (2) अंतर्गत ही एनसी दाखल करण्यात आली आहे. यामुळे आमदार गायकवाड यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, संजय गायकवाड यांनी आपल्याला अशा प्रकारच्या कोणत्याही गुन्ह्याची काळजी नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. ते म्हणाले, मी कोणताही मोठा गुन्हा केला नाही. मी चांगल्या गोष्टीसाठी सौम्य मारहाण केली. चांगल्या गोष्टीसाठी माझ्यावर कितीही गुन्हे दाखल केले तरी आय डोन्ट केअर.

गुन्हा दाखल झाला, तर मी सामोरा जाईन. गंभीर काहीच नाही. मेडिकल कुणाचेही झाले नाही. कुणी जखमी नाही. गंभीर मारहाण नाही. सौम्य मारहाण आहे. माझ्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल झालाय का? करप्शनचा गुन्हा दाखल झालाय का? माझ्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल झाला आहे आणि तो मी मान्य करत आहे. माझ्या माहितीनुसार, असा गुन्हा दाखल करण्याचा किंवा तक्रारीचा पोलिसांना अधिकार नाही.

302, 307चा गुन्हा असेल, तर त्यात पोलिस फिर्यादी होऊ शकतात. माझ्या प्रकरणात कुणीही किंवा मार खाणाऱ्याने तक्रारच दिली नाही. सरकार अडचणीत येणासारखा हा एवढा मोठा विषय आहे का? एक सौम्य मारहाणीचा विषय आहे. महाराष्ट्राचे नुकसान होणार आहे, एवढा काय मोठा मुद्दा आहे का? विरोधकांनी हा मुद्दा मोठा समजला. ते नालायक आहेत, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे संजय गायकवाड यांनी यापूर्वीच आपल्याला आपल्या कृत्याचा कोणताही पश्चाताप नसल्याचे स्पष्ट केले आहे. माझा मार्ग चुकला असला तरी, मी जे केले त्याचा मला कोणताही पश्चाताप नाही. किंबहुना मी मारहाण केल्यामुळेच निकृष्ट अन्न पुरवणाऱ्या कॅन्टीवर कारवाई झाली. मी फक्त जराशी मारहाण केली. त्यामुळे एनसी होऊ शकते. हा फार मोठा गुन्हा नाही. मलाही कायदा माहिती आहे. मी याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना भेटून माहिती देणार आहे. त्यांना मी दोषी वाटत असेन तर मी ते देतील ती शिक्षा भोगायला तयार आहे, असे ते म्हणाले होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ जुलै २०२५


## सामाजिक न्यायमंत्र्यांच्या हातात सिगारेट अन् शेजारी पैसे; वादानंतर स्वत:च दिले स्पष्टीकरण



**मुंबई :** महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये संजय शिरसाट आपल्या बेडरूममध्ये बसलेले सिगारेट पीत आहेत आणि समोर एक बॅग दिसत आहे. या बॅगमध्ये पैसे असल्याचा दावा केला जात आहे. तसेच बाजूला आणखी एक बॅग उभी असल्याचे दिसत आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री संजय शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे, त्यात एका बॅगमध्ये पैसे असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. यावर संजय शिरसाट यांनी स्पष्टीकरण दिले असून राऊत यांनी केलेले आरोप फेटाळून लावले आहेत.

विधानभवनाच्या परिसरात पत्रकारांशी बोलताना संजय शिरसाट यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, संजय राऊत यांनी आजही ठरल्याप्रमाणे भुंकण्याचे काम केले आहे. एकनाथ शिंदे दिल्लीला गेले होते, मग ते अमित शहा यांना भेटले आणि शिवसेना भाजपमध्ये विलीन करतो म्हणाले, असे मूर्खासारखे स्टेटमेंट संजय राऊतच करू शकतात. आम्ही जे काही त्यांना टोचले आहे, त्याची जखम आजही त्यांची भळभळते.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, एकंदरीत टार्गेट एकनाथ शिंदे असतात. एकनाथ शिंदे यांनी 3 वर्षापूर्वी जी काही भूमिका मांडली होती त्यामुळे त्यांची गेलेली सत्ता त्यांना स्वस्थ बसू देत नाही. आम्हाला सत्तेतून या माणसाने खेचले. माझी खुर्ची घेतली, मग 50 खोके, या सगळ्या वल्गना करून झाल्यावर नवीन स्टोरी बनवतात. संजय राऊत यांना हातपाय बांधून हॉस्पिटलमध्ये न्यावे की के अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

व्हिडिओ काय दाखवतो आहे की माझे घर आहे, माझी बेडरूम आहे, माझा लाडका कुत्रा आहे आणि एक बॅग तिथे ठेवली आहे. याचा अर्थ मी प्रवास करून आलो आहे आणि मी बेडवर बसलो आहे. अरे मूर्खांनो, पैसे असते तर अलमारीमध्ये ठोसले असते. परंतु, यांना कपड्याची बॅग सुद्धा पैशांची बॅग वाटते. यांना पैशांशिवाय काहीच दिसत नाही. एकदा एकनाथ शिंदे साहेब त्यांच्या विमानातून खाली उतरून जात होते आणि त्यांचे बॉडीगार्ड ज्या काही बॅगा घेऊन चालले होते, त्यात पण यांना पैसे असल्याचे वाटले होते.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, आमच्याकडे मातोश्री 1, मातोश्री 2 नाही. माझे मतदारसंघातील प्रत्येक माणसाला विचारा, सगळ्यांना स्वागत असते. कार्यकर्ते असतात, एखाद्याने उत्साहाच्या भरात व्हिडिओ काढला असेल. माझ्याकडे कोणालाही चिठ्ठी देऊन बोलावले जात नाही. कार्यकर्त्यांसाठी आम्ही आहोत. आम्हाला शिवसेना प्रमुखांनी आम्हाला शिकवले आहे, तुम्ही कार्यकर्ता म्हणून रहा.

महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये पैशांनी भरलेली एक बॅग दिसत असून स्वतः संजय शिरसाट बेडवर बसून सिगारेट ओढत फोनवर बोलताना दिसून येत आहेत. यावरून विरोधकांनी त्यांच्यावर चांगलीच टीकेची झोड उठवली आहे. एवढे पैसे आले कुठून? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

## भाजप आमदाराला पाहताच आव्हाडांची नारेबाजी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार तथा मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी आज विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोरांचा' अशी घोषणाबाजी केली. आव्हाड यांनी रस्त्यात चालताना अचानक ही घोषणाबाजी सुरू केल्यामुळे सर्वांच्या नजरा त्यांच्याकडे रोखल्या गेल्या होत्या.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्यावर अश्लाघ्य शब्दांत टीका केली होती. सासू ख्रिश्चन, नवरा ब्राह्मण, बाप मराठा व आई दुसरीच असे एक कॉकटेल घर पुण्यात आहे, असे ते म्हणाले होते. यावेळी त्यांनी पवार कुटुंबीयांचे नाव घेतले नव्हते. पण त्यांचा रोख त्यांच्याच दिशेने होता. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आज त्यांना जशासतसे प्रत्युत्तर दिले.

त्याचे झाले असे की, गोपीचंद पडळकर आज आपल्या सहकाऱ्यांसोबत विधिमंडळ परिसरात संवाद साधत उभे होते. त्यांच्या विरुद्ध दिशेने जितेंद्र आव्हाड येत होते. त्यांनी पडळकर यांना पाहताच मंगळसूत्र चोरांचा... मंगळसूत्र चोरांचा अशा घोषणा दिल्या. या अनपेक्षित घटनेमुळे सर्वचजण आव्हाड यांच्याकडे आश्चर्याने पाहत होते. पण आव्हाड यांचा रोख कळून येताच सर्वजण पडळकर व आव्हाड यांच्याकडे पाहू लागले. विशेष म्हणजे आव्हाड यांनी यावेळी पडळकर यांचे नाव घेतले नाही. ते केवळ मंगळसूत्र चोरांचा असे नारे देत राहिले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधून ते सभागृहाच्या दिशेने निघून गेले.

उल्लेखनीय बाब म्हणजे गोपीचंद पडळकर यांनी आतापर्यंत अनेकदा शरद पवारांवर निम्न पातळीवर जाऊन टीका केली होती. यापूर्वी त्यांनी पवारांचा उल्लेख महाराष्ट्राला लागलेला कोरोना म्हणून केली होती. शरद पवार हे महाराष्ट्राला लागलेला कोरोना आहे असे माझे मत आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून ते महाराष्ट्राचे नेतृत्व करत आहेत. राज्यातील बहुजनांवर अत्याचार करण्याची भूमिका त्यांची कायम राहिली आहे. ते ही भूमिका यापुढेही चालू ठेवतील. त्यांच्याकडे ना कुठली विचारधारा आहे, ना कुठला अजेंडा आहे, ना कुठले व्हिजन आहे.

फक्त छोट्या - छोट्या समूह गटांना भडकावायचे, आपल्या बाजूला करायचे, त्यानंतर त्यांच्यावरच अन्याय करायचा अशी त्यांची भूमिका आहे. मला वाटत नाही ते धनगर आरक्षणावर पॉझिटिव्ह असतील. त्यांना फक्त धनगर समजाच्या आरक्षणाचे राजकारण करायचे आहे. मागील बजेटमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी 1 हजार कोटींचं पॅकेज घोषित केले होते. पण या सरकारने एक रुपयाही धनगर आरक्षणाला दिला नाही. त्यामुळे विधानसभेच्या अधिवेशनात यावर बोलावे लागेल, असे ते म्हणाले. पडळकर यांच्या या विधानाचे तेव्हा तीव्र पडसाद उमटले होते. त्यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी पडळकरांची गाडीही फोडली होती.

## चीनमधून होणारी बेकायदा आयात थांबवा : उपमुख्यमंत्री अजित पवार



**मुंबई :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्र सरकारला पत्र लिहून चीनमधून होणारी निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यांची आयात थांबवण्याची मागणी केली आहे. चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची आयात होत आहे. यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे व राष्ट्रीय महसुलाचे नुकसान होत आहे. त्यामुळे चीनमधून होणारी बेदाण्यांची बेकायदा आयात थांबवावी. तसेच बेदाण्यांचे दर स्थिर ठेवून द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य द्राक्ष उत्पादक संघ पुणे यांनी नुकतीच अजित पवार यांची भेट घेऊन त्यांचे चीनमधील निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. तसेच त्यांना हा मुद्दा प्राधान्यक्रमाने सोडवण्याचे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान व केंद्रीय व्यापारमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहिले आहे. त्यांनी या पत्राद्वारे महाराष्ट्रासह देशभरातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे.

अजित पवार आपल्या पत्रात म्हणतात, चीनमधून निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यांची बेकायदा आयात वाढली आहे. आयात कर आणि शुल्क चुकवून बेदाणे मोठ्या प्रमाणावर भारतात आणले जात आहेत. या करचोरीमुळे शासनाचा महसूल बुडत असून देशाच्या महसुलाचे नुकसान होत आहे. ऐन हंगामात होत असलेल्या या बेकायदा आयातीमुळे देशातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या बेदाण्यांचे दर प्रतिकिलो शंभर ते सव्वाशे रुपयाने घसरले आहेत. याचा फटका द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना बसला असून त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

हे टाळण्यासाठी केंद्र सरकारने तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात. बेकायदा आयात व विक्री थांबवण्यासाठी कठोर कारवाई करावी. आयात होणाऱ्या बेदाण्यांचा दर्जा तपासण्यासाठी तसेच करवसुली योग्य, अचूक होण्यासाठी बंदरे, विमानतळ, बाजारपेठांच्या ठिकाणी तपास व करवसुली यंत्रणा कार्यक्षम करावी. ऐन हंगामात बाजारातील बेदाण्यांचे दर स्थिर राखून शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तात्काळ कराव्यात, असे अजित पवार यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.


